# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO:9001:2000)

शासकीय तं निकेतन इमारत, चौथा मजला,

४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र. २६४७१२५५(का)/३२५०८७०६ (वै.) फॅक्स क्र :०२२-२६४७३९८०

email : secretary @ msbte.com Web : www.msbte.com


---

जा.क्र.मरातंशिमं/का-४०/बी-६/बी-४२/२००९/२८५ दिनांक - १८.०७.२००९

प्रति,
उपसचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ,
विभागीय कार्यालय,
पुणे/औरंगाबाद/नागपूर तसेच
प्रभारी अधिकारी, मुंबई उपविभाग

विषय - उन्हाळी परीक्षा - २००९ च्या निकालाबाबत..
गुणपत्रिका सांख्यिकी

विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका आपल्यामार्फत संस्थेस वितरीत करण्यात येतात असे आढळून आले आहे की, काही संस्था गुणपत्रिका मिळाल्या नाहीत असे परस्पर मंडळास कळवितात. त्यामुळे गुणपत्रिका आपल्या कार्यालयामार्फत देण्यात आल्या किंवा नाही ह्याचा काही अर्थबोध होत नाही व पुढील कार्यवाही करणे अडचणीचे होते.

उपरोक्त प्रकरणी आता खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

संस्थेस गुणपत्रिका वितरीत करताना संस्थेच्या निकालपत्राप्रमाणे गुणपत्रिकांची सांख्यिकी (संख्या) जुळते किंवा नाही ह्याची तपासणी संस्थेच्या प्रतिनिधीस करण्यास सांगावी. एखादी गुणपत्रिका मिळाली नसल्यास तसे ह्या कार्यालयास तात्काळ कळविण्यात यावे जेणेकरुन पुढील कार्यवाही करता येईल.

(प्र. अं. नाईक)
सचिव
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

ह्य२००९ष्ट्रह्ल/४८

# महाराष्ट्र राज्य तं शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO:9001:2000)

शासकीय तं निकेतन इमारत, चौथा मजला,

४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र. २६४७१२५५(का)/३२५०८७०६ (वै.) फॅक्स क्र :०२२-२६४७३९८०

email : secretary @ msbte.com Web : www.msbte.com

---

जा.क्र.मरातंशिमं/का-४०/बी-६/बी-४२/२००९/२८६ दिनांक - १८.०७.२००९

प्रति,

प्राचार्य / संस्थाप्रमुख,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी
संलग्न असलेल्या संस्था –

विषय - उन्हाळी परीक्षा -२००९ चा निकाल जाहीर करणेबाबत

आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने घेतलेल्या वार्षिक पध्दतीच्या तथा सत्र पध्दतीच्या अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा निकाल दिनांक २०.०७.२००९ रोजी दुपारी ३.०० वा. मंडळाच्या संकेतस्थळावर घोषित करण्यात येत आहे.

सदर अभ्यासक्रमांची संस्थांची निकालपत्रके व विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका दिनांक २४.०७.२००९ रोजी विभागीय कार्यालयात उपलब्ध होतील. गुणपत्रिका दिनांक २५.०७.२००९ रोजी संदर्भीय परिपत्रकान्वये काळजीपूर्वक तपासून विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात याव्यात.

मंडळाने २००९-१० या शैक्षणिक वर्षाचे अॅकेडमिक कॅलेंडर प्रसिध्द केलेले असून त्याचे पालन संस्थांनी काटेकोरपणे करावे.

(प्र. अं. नाईक)
सचिव
म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत-

१. संचालक, म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना माहितीसाठी सादर
२. उपसचिव,म.रा.तंत्र शिक्षण मंडळ वि.का. पुणे/औरंगाबाद/नागपूर तसेच प्रभारी अधिकारी, मुंबई उपविभाग यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी
३. पोर्टल मॅनेजर, म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना सदर परिपत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात यावे.

ह्य२००९ष्द्वह्र/४९

# महाराष्ट्र राज्य तं शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO:9001:2000)

शासकीय तं निकेतन इमारत, चौथा मजला,
४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र. २६४७१२५५(का)/३२५०८७०६ (वै.) फॅक्स क्र :०२२-२६४७३९८०
email : secretary @ msbte.com Web : www.msbte.com

---

जा.क्र.मरातंशिमं/का-४०/बी-६/बी-४२/२००९/२८७ दिनांक - १८.०७.२००९

प्रति,

प्राचार्य / संस्थाप्रमुख,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी
संलग्न असलेल्या संस्था –

विषय :– निकाल जाहिर केल्यानंतर निकालपत्रक व गुणपत्रिका तपासून कार्यवाही करण्याबाबत.

महोदय,

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या उन्हाळी २००९ परीक्षांचा निकाल मंडळाच्या संकेतस्थळावर घोषित करण्यात येत असून त्या अनुषंगाने संस्थांनी खालील सूचनांचे पालन करावे.

संस्थेच्या प्रतिनिधीने निकालपत्रके घेतांना तपासून घ्यावीत व त्रुटी असल्यास त्या बद्दल लेखीपत्र विभागीय उपसचिवांना द्यावे. निकाल जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या व गुणपत्रिकांची संख्या पडताळून पहावी. एखाद्या विद्यार्थ्याची गुणपत्रिका मिळाली नसल्यास विभागीय कार्यालयाकडून तशा आशयाचे लेखी पत्र प्राप्त करावे व मंडळाच्या मुख्य कार्यालयाकडे ( लक्षवेध - कार्यासन क्रमांक - ४० कडे ) पाठवावे.

संस्थेचे प्राप्त झालेले निकालपत्र विद्यार्थ्यांनी भरलेल्या परीक्षा अर्जाप्रमाणे तसेच संस्थेने दिलेल्या अँडिशनल सिट नंबर्स प्रमाणे आहेत ह्यांची खात्री करावी. सदरचा निकाल मंडळाने निकाल जाहिर करण्याच्या नियमांच्या अधिन राहून जाहिर करण्यांत येत आहे.

सत्र पध्दतीच्या निकालाबाबत खालीलप्रमाणे नियम आहेत.

१. सत्र पध्दतीमध्ये ८० गुणांची सैध्दान्तिक परीक्षा (थिएरी पेपर्स) आणि २० गुणांचे टेस्टमार्क्स अशी प्रत्येक विषयाची १०० गुणांची परिक्षा असून सैध्दान्तिक परीक्षेमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यास किमान २८ गुण मिळणे आवश्यक आहे. विषयवार ३ गुणांचे ग्रेस मार्क्स मिळण्यासाठी सदर सैध्दान्तिक विषयात किमान २८ गुण मिळविणे आवश्यक आहे. विषयनिहाय टेस्टमार्क्स गुणांना उत्तीर्णता असा निकष असणार नाही.

२. मात्र आर इ- १५ बी प्रमाणे विद्यार्थ्यास एकूण गुण किमान ५० टक्के असल्यास कंडोनेशनचा लाभ एका विषयशीर्षामध्ये अधिकतम १० गुण किंवा दोन विषयशीर्षामध्ये विभागणी करुन अधिकतम १० गुणांच्या मर्यादेतच अनुज्ञेय आहेत. जास्तीत जास्त १० गुण कंडोन्ड केल्यांनतर विद्यार्थ्यास सैध्दान्तिक विषयामध्ये किमान २८ गुण व एकूण किमान ४० गुण (उत्तीर्णतेचा निकष ४० टक्के असल्यास) तथा ३६ गुण व एकूण ५० गुण (उत्तीर्णतेचा निकष ५० टक्के असल्यास)(अँडव्हान्स डिप्लोमा कोर्सेस तसेच पोस्ट ग्रॅज्यूएट डिप्लोमा कोर्सेस) मिळणे आवश्यक आहे. कंडोन्ड

केल्यानंतरही विद्यार्थ्यास २८ गुण मिळत नसतील तर त्यास कंडोनेशचा लाभ अनुज्ञेय नाही. उदा. सैध्दान्तिक विषयात १७ गुण व टेस्टमार्क्समध्ये १८ गुण एकूण गुण ३५ असतील अशा प्रकरणी कंडोनेशन सुविधेच्या १० गुणांनंतरही सैध्दान्तिक विषयामध्ये २८ गुण होत नसल्याने या प्रकरणी कंडोनेशन अनुज्ञेय नाही. कंडोन्ड केल्यानंतर विद्यार्थ्याचा निकाल त्या सत्रासाठी किमान उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. ज्या प्रकरणी विद्यार्थ्यास विषयात इ एक्स (एक्झम्पशन) आहे, त्या सत्रांत कंडोनेशनचा लाभ अनुज्ञेय नाही.

३. **सत्र अभ्यासक्रमाच्या पदविका अभ्यासक्रमांचे प्रथम-व्दितीय, तृतीय-चतुर्थ, पाचव्या-सहाव्या सत्रांचे निकाल एकत्रितरित्या जाहीर केले जातात. मात्र उन्हाळी परीक्षा २००९ पासून पहिल्या ते पाचव्या सत्राच्या (ज्या स्थितीत विद्यार्थी प्रथमतः पाचव्या सत्रास अॅपिअर होत आहे त्या स्थितीत) गुणपत्रिका स्वतंत्ररित्या (सत्रनिहाय) प्रदान करण्यात येतील. निकालपत्रकावरील निकाल मात्र प्रथम-व्दितीय, तृतीय-चतुर्थ तथा पाचव्या सहाव्या सत्रांचा असा एकत्रित जाहीर करण्यात येणार आहे. गुणपत्रिकेवर विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी ते पुढील सत्रास पात्र आहेत अगर नाहीत हे नमुद करण्यात येणार असून मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावलीतील आर जी २ डी (तथा आर इ ११ प्रमाणे)मध्ये नमुद तक्त्यानुसारच ए टी के टी (तथा एफ टी) प्रदान करण्यात येणार आहे. म्हणजेच विद्यार्थ्यांचा उचित स्टेटस (True Status) हा सत्रनिहाय (पहिल्या ते पाचव्या सत्रापर्यंत) जाहीर होणार आहे. मात्र पाचव्या - सहाव्या सत्राची एकत्रितरित्या गुणपत्रिका प्रदान करताना त्यांची एकत्रित टक्केवारी व त्यानुसारची श्रेणी (Class on Aggregate Percentage) गुणपत्रिकेवर नमुद करण्यात येईल. तसेच व्दितीय व चतुर्थ सत्रांच्या गुणपत्रिकांवर विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी व अन्य उचित संदर्भासाठी मागील सत्रांची माहिती नमुद करण्यात येणार आहे. ही माहिती अचूक आहे की नाही याबाबत संस्थांनी आवश्यक ती दक्षता घ्यावयाची आहे. (उदा. विद्यार्थ्यांना सदर माहिती तपासण्यास सांगणे, उत्तीर्ण सत्रांच्या हिस्ट्री विषयी विशेष दक्षता घेऊन ते तपासणे इत्यादी. ) यामध्ये काही चूक आढळल्यास ती थेट मुख्य कार्यालयातील निकाल प्रक्रिया युनिट - कार्यासन क्र. ४५ यांचे निदर्शनास फॅक्सपत्राव्दारे आणून द्यावयाची आहे.**

संस्थेमध्ये प्राप्त झालेले निकालपत्रक अभ्यासक्रमाचे टिचींग स्कीमनुसार व मंडळाचे निकाल जाहीर करण्याचे नियमांना आणि उपरोक्त नमुद केलेल्या सत्र पध्दतीच्या नियमांना अनुलक्षून बारकाईने तपासून पहावे. विशेषतः ATKT ची प्रकरणे मंडळाच्या नियमांप्रमाणे (सत्र पध्दती ) तपासावीत तसेच निकालाशी निगडीत इतर बाबीदेखील तपासाव्यात.

**उदाहरणादाखल –**

(१) अंतिम वर्ष / सत्राचा निकाल जाहीर करण्यापूर्वीच्या सर्व अटींना विद्यार्थीपात्र असणे.

(२) वेळोवेळी झालेल्या अभ्यासक्रम सुधारणेनुसार सर्व आवश्यक विषयात पास होणे तसेच मिसींग व अॅडीशनल विषयात पास असणे.

(३) विद्यार्थी DISALLOWED किंवा CPS प्रकरणामध्ये अपात्र नसणे

(४) ज्या विद्यार्थ्यांना संस्थेतर्फे गुणपत्रिकेत EX दर्शविले आहे, परंतु मंडळाकडून विषयात सुट मंजूर झाल्याचे आदेश प्राप्त झालेले नाहीत अशा विद्यार्थ्यांचे निकाल रोखुन ठेवावेत व त्यांना गुणपत्रिका देण्यांत येऊ नयेत. मंडळाकडून त्यांच्या विषयातील सुट मंजूर झाल्यानंतरच त्यांचा निकाल जाहीर करण्यांत यावा याची नोंद घ्यावी.

(५) नियम RE- 5, RE- 8 व नियम RE-18 प्रमाणे अनुक्रमे श्रेणीवाढ तथा फेर परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांचे गुण त्यांनी दिलेल्या विषयाप्रमाणे आहेत. अथवा मागील परीक्षेचे गुण # लावून आलेले आहेत यांची खात्री करावी तद्नंतरच विद्यार्थ्यास गुणपत्रिका द्यावी. विषय अथवा गुणात त्रुटी असल्यास विद्यार्थ्यास निकाल देऊ नये.

(६) ह्या व्यतिरिक्त इतर कांही त्रुटी आढळल्यास अशा विद्यार्थ्यांचे निकाल संस्थेने देऊ नयेत. ज्या विद्यार्थ्यांचा पूर्व इतिहास चुकीचा कळविण्यांत आला आहे, अगर विहित मुदतीनंतर कळविण्यांत आला आहे. अगर ज्यांचेबाबत अद्याप काही चौकशी सुरु आहे, अशा विद्यार्थ्यांचे निकाल "**+ RHR** " (Forced RHR)असे जाहीर करण्यांत येत आहेत. सदर "**+ RHR** " ची प्रकरणे निकाली काढण्याकरीता आवश्यक ती माहिती संस्थांनी विहित मुदतीत मंडळाकडे सादर करणे आवश्यक आहे.

(७) डीसअलाऊड विद्यार्थ्यांचे नावासमोर DIS असे छापून येणे आवश्यक असून विद्यार्थी अपवादात्मक परिस्थितीत परीक्षेस बसला असेल तरीही ते गुण संस्थेच्या निकालपत्रकावर छापून आले असल्यास त्यावर तात्काळ खाकी रंगाची अपारदर्शक चिकटपट्टी लावण्यात यावी.

अंतिम वर्षाच्या / सत्राच्या परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्याबाबत त्यांची मागील वर्षाची / सत्राची " प्रिव्हीयस हिस्ट्री " तपासण्यांत आली आहे त्याप्रमाणे **WFLY / WFLS** अगर **PLY / LSP** असा अभिप्राय नोंदला आहे. **अंतिम वर्षाच्या / सत्राच्या विद्यार्थ्यांचा परीक्षा अर्ज सादर करतांना विद्यार्थी परीक्षा पूर्व पात्रता धारण करीत असल्याचे संस्थेच्या प्राचार्यांनी प्रमाणित केले असल्याने, त्यांच्या मागील वर्षाच्या / सत्राच्या परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा पूर्व इतिहास तपासलेला नाही याची आपण नोंद घ्यावी. जर विद्यार्थी परीक्षा पूर्व पात्रता धारण करीत नसल्याचे निदर्शनास आल्यास संस्थेने विद्यार्थ्यास निकाल देऊ नये व मंडळास तात्काळ लेखी कळवावे. या प्रकरणी नियम आर .जी. - ४ एफ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.**

**ज्या विद्यार्थ्यांना उन्हाळी परीक्षा- २००९ मध्ये गैरप्रकार अवलंबिल्याप्रकरणी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती किंवा गुणमुल्यांकन केंद्राकडून ज्या विद्यार्थ्यांच्या/संस्थांच्या संभाव्य गैरप्रकाराबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या आणि ज्या प्रकरणी चौकशी पूर्ण होऊन विद्यार्थी दोषी आढळले आहेत, त्यांना स्वतंत्र परिपत्रकाव्दारे मंडळाच्या नियमाप्रमाणे शिक्षा निर्देशित करण्यात आलेल्या आहेत. संस्थांनी सदर परिपत्रक विभागीय कार्यालयांकडून स्वीकारणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली होती मात्र त्या विद्यार्थ्यांची नावे सदर परिपत्रकांत नाहीत असे विद्यार्थी निर्दोष आहेत असे मानावेत मात्र त्याबाबत मंडळाच्या मुख्य कार्यालयाकडून रितसर शहानिशा करुन घ्यावी व ते निर्दोष असतील तर त्यांचा निकाल जाहीर होण्याबाबत आवश्यक तो पाठपुरावा संस्थाप्रमुखांनी (प्रामुख्याने अंतिम सत्रांच्या विद्यार्थ्यांबाबत) करावा. ज्या विद्यार्थ्यांचे निकाल आर एच आर तथा + आर एच आर असे आहेत त्याबाबत सदर विद्यार्थ्यांची पूर्ण माहिती परीक्षा विभागाकडे सादर करावी व ते आर एच आर तथा + आर एच आर विहित मुदतीत निकाली निघतील याकडे विशेष अवधान द्यावे.**

अंतिम वर्ष निकाल दुरूस्तीसाठी (उदा-**WFLY, RHR, PLY & NAME C0RRECTION**) मंडळाने घोषित केलेल्या कार्यक्रमानुसार संस्थेच्या माहितगार प्रतिनिधीस आवश्यक त्या कागदपत्रासह पाठवावे. या प्रकरणाची माहिती आणि त्यांचा प्रकरणवार इतिहास योग्य त्या तक्त्यात नमुद करण्यात यावा. असे प्रत्येक प्रकरण निकाली होईल अशा प्रकारे सर्व माहिती व माहितीच्या पृष्ट्यर्थ कागदपत्रे मंडळास सादर करणे अत्यंत गरजेचे आहे. ज्या विद्यार्थ्यांचा

निकाल ह्यापूर्वी **WFLY** आहे व आताचा खालील वर्षाचा निकाल **RHR** आहे  अशा विद्यार्थ्याची प्रकरणे सुध्दा अंतिम वर्ष/सत्र निकाल दुरूस्ती ह्या सदरात समाविष्ट होतील.  अंतिम वर्षासाठीच्या निकालदुरुस्तीसाठी स्वतंत्र वेळापत्रक निश्चित करण्यात आलेले असून त्याचे पालन संस्थांनी करणे बंधनकारक आहे.

वरील वर्षाच्या / अंतिम वर्षाच्या नावात दुरूस्ती करावयाची असल्यास खालील वर्षाचे ( प्रथम / द्वितीय ) निकालात नाव बरोबर आहे किंवा नाही ह्याबद्दल विस्तृत माहिती ( उदा.–परीक्षेचे वर्ष, आसन क्रमांक इत्यादी ) पाठवावी. नावात दुरूस्तीसाठी विहित पध्दतीनुसार मेरिट लिस्ट / दहावीच्या गुणपत्रिकेची /प्रमाणपत्राची / लिव्हींग सर्टिफिकेट इत्यादीची प्रमाणित प्रत पाठवावी. ) अंतिम सत्रा/वर्षापूर्वीच्या सत्रांतील/वर्षातील परीक्षेच्या गुणपत्रिकांमध्ये/प्रमाणपत्रांमध्ये नावांत बदल करावयाचा असल्यासही आवश्यक कागदपत्रे सादर करावीत.  ज्या विद्यार्थ्यांच्या नावांत बदल अपेक्षित आहे त्यांना गुणपत्रिका/प्रमाणपत्र वितरीत करण्यात येवू नये.  मंडळाच्या आर जी १३ नुसार अंतिम सत्राचा/वर्षाचा निकाल जाहीर झाल्यानंतर नावांत बदल करण्याबाबतची प्रकरणे स्वीकारली जाणार नाहीत याची संस्थांनी नोंद घ्यावी व विद्यार्थ्यांनाही या बाबत न चुकता तात्काळ अवगत करावे.

ब-याचशा संस्था निकाल जाहीर झाल्यानंतर **SW,OR, TW, TM**  इत्यादी विषयांचे चुकीचे गुण परीक्षकांच्या गुणपत्रिकेत भरून पाठविण्यांत आल्याचे कळवितात. अशी प्रकरणे संस्था विभागीय कार्यालयांत सादर करत असल्याचे आढळून आलेले आहे.  परंतु सादर केलेली कागदपत्रे अपुरी असतात.   ह्यामुळे प्रकरणांचा निपटारा करणे अडचणीचे होते. **अशा प्रकारची प्रकरणे आपण मंडळाच्या मुख्य कार्यालयाकडे संस्था प्रतिनीधीमार्फत पाठवावीत.**   संस्था प्रमुखांनी ह्याबाबत मंडळाच्या मुख्य कार्यालयांत सचिव / उपसचिव, निकाल विभाग ( **EXT - 439** )  ह्यांच्याशी दूरध्वनीवरून प्रथम संपर्क साधावा.  आवश्यक त्या सर्व **मूळ कागदपत्रांसह** संस्था प्रतिनीधीस मंडळाच्या मुख्य कार्यालयात उपस्थित रहावे लागेल.  सतत मुल्यांकनाची (कंटीन्यूअस असेसमेंट) गुणांची प्रपत्रे संस्थेत उघडली गेली असतील, त्यांत खाडाखोड असेल व संबंधितांची  सही नसेल इरेझर इंकचा   उपयोग केला असेल तर अशी प्रपत्रे मंडळ स्वीकारणार नाही.  ती सादर करु नयेत. तसेच या प्रकरणी संस्थेवर दंडात्मक कार्यवाही होण्याची शक्यता आहे, ह्याची नोंद घ्यावी.

**टिप-**    ज्या विद्यार्थ्याच्या निकालात दुरुस्ती **WFLY, PLY, RHR** व नावात दुरुस्ती इत्यादी दुरुस्ती  करावयाची आहे, ह्याची माहिती Table- D-40/C, D-40/D मध्येच  भरुन पाठवावी. हे तक्ते विभागीय कार्यालयाकडून प्राप्त करावेत. सदरचे तक्ते आणि आवश्यक ती सर्व माहिती माहितगार दूतामार्फत दिलेल्या कार्यक्रमानुसार सादर करावी.  निकाल दुरुस्तीच्या कार्यक्रमासाठी सोबत जोडलेले प्रपत्र -अ पहावे.

परीक्षेच्या निकालात **WFLY/WFLS**  असणा–या विद्यार्थ्याचे गुण छापण्यांत आलेले आहेत. सदरचे गुण फक्त माहितीसाठी असुन या गुणांवरुन विद्यार्थ्यास कोणतीही गुणपत्रिका किंवा (कोणत्याच प्रकारचे) प्रमाणपत्र देण्यांत येऊ नये. असे प्रमाणपत्र अथवा गुणपत्रिका दिलेली आढळल्यास संस्थावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल याची विशेष नोंद घ्यावी. निकालपत्रात विद्यार्थ्यांचे विषयवार गुणानंतर विद्यार्थ्यांचे मागील परीक्षेचा आसन  क्रमांक, नोंदणी क्रमांक छापण्यांत आलेला आहे. या आसन क्रमांकाप्रमाणे विद्यार्थ्याचे मागील परीक्षेमधील गुण पुढे घेण्यांत आलेले आहेत. हा क्रमांक आपण तपासून योग्य असल्याची शहानिशा करावी.  ह्या आसन क्रमांकामध्ये विसंगती / त्रुटी असल्यास लेखी स्वरुपात मंडळाच्या त्वरीत  निर्देशनास आणून द्यावे.  अन्यथा सदरचा आसन क्रमांक व त्यावरुन घेतलेले गुण योग्य आहेत असे समजण्यांत येईल.  श्रेणीवाढ परीक्षेसाठी बसणाऱ्या विद्यार्थ्याचे आसन क्रमांकाखाली " **I** " असा शब्द छापण्यांत आला आहे. रिॲपिंअरींगसाठी " **R** " असा शब्द छापण्यात आला आहे याची नोंद घ्यावी व त्यात काही त्रुटी असल्यास मंडळास लेखी कळवावे.

**उन्हाळी परीक्षा-07 या परीक्षेपासून मंडळाचे परिपत्रक जा.क्र.मरातंशिमं/का-५०/२००७/डीक्यू/ ४१ दि. २० मार्च २००७ अन्वये कॉम्प्यूटर इंजिनिअरींग/कॉम्प्यूटर टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमांचे  व्दितीय आणि तृतीय वर्ष वगळता अन्य अभ्यासक्रमांचे O, N, R, S मास्टर्सचे निकाल A मास्टरमध्ये जाहीर करण्यात आले आहेत.  जे विद्यार्थी हिवाळी २००८ परीक्षेपूर्वीच या मास्टर्समधील काही विषयांमध्ये उत्तीर्ण झालेले आहेत, त्यांचे गुण समकक्ष विषयांमध्ये**

**दर्शविण्यात आलेले आहेत. त्या गुणांत कोणतीही तफावत आढळल्यास अशी गुणपत्रिका विद्यार्थ्यास देऊ नये व मंडळास तात्काळ कळविण्यात यावे. या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका अत्यंत काळजीपूर्वक तपासून निकाल अचूक जाहीर झाले आहेत याची खात्री प्राचार्यांनी स्वतः करुन घ्यावी आणि त्यानंतरच गुणपत्रिकांचे वितरण करावे.**

<u>सर्वसाधारण /शीघ्र गुणपडताळणीसाठी कार्यपध्दती –</u>

मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावलीतील नियम क्र. आर जी ९ - जे नुसार विद्यार्थ्यास आवश्यकता वाटल्यास प्राप्त गुणासंदर्भाने गुणपडताळणी करण्याची संधी देण्यात येत आहे. या अनुषंगाने शीघ्र तथा सर्वसाधारण गुणपडताळणीचा कार्यक्रम निश्चित करण्यात येत असून सदर कार्यक्रमाचे वेळापत्रक यासोबत जोडण्यात आलेले आहे. ही दोन्ही कार्यक्रम पत्रे विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणणे ही संस्थांची संपूर्ण जबाबदारी आहे. याच अनुषंगाने असेही कळविण्यात येते की, गुणपडताळणीमध्ये ज्या विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये बदल झालेला आहे असे मंडळाकडून कळविण्यात आलेले आहे अशा विद्यार्थ्यांची निकालदुरुस्ती आणि सुधारित गुणपत्रिका संस्थेने मंडळाकडे पाठपुरावा करुन मिळवावयाची असून विहित मुदतीतच ती विद्यार्थ्यास प्रदान करण्यात यावी. **सर्वसाधारण गुणपडताळणीसाठी संस्थेमार्फत किती विद्यार्थ्यांनी अर्ज केलेले आहेत व त्या सर्वांचे गुणपडताळणीनंतरचा अहवाल (बदल वा ना बदल) प्राप्त झाला आहे की नाही याची संपूर्ण खातरजमा संस्थेने करणे बंधनकारक आहे. संस्था गुणपडताळणीनंतरच्या बदल न झालेल्या अहवालांबाबत पुरेशा गंभीर नसतात असे निदर्शनास आलेले आहे. शीघ्र गुणपडताळणीचेबाबत थेट विभागीय कार्यालयांमध्ये विद्यार्थी अर्ज सादर करीत असल्याने विभागीय कार्यालयांनी याबाबत विशेष दक्षता घेऊन गुणपडताळणीचे आवश्यक अहवाल (बदल वा ना बदल) मुख्य कार्यालयाकडून प्राप्त होतील याबाबत पाठपुरावा करणे आवश्यक आहे.**

ज्या विद्यार्थ्यांचे निकाल आर एच आर/प्लाय/डब्ल्यू एफ एल वाय/पी एल एस/डब्ल्यू एफ एल एस असे लागलेले असतील अथवा नाव व गुण छापले गेले नसतील अशा विद्यार्थ्यांना ह्या परीक्षेतील गुणांची गुणपडताळणी(शीघ्र तथा सर्वसाधारण) करावयाची असल्यास अशा विद्यार्थ्यांचे अर्ज स्विकारता येतील. अशा प्रकारचा निकाल असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनीसुध्दा इतर विद्यार्थ्यासोबतच गुणपडताळणीचे अर्ज भरणे आवश्यक आहे. <u>विलंबाने आलेले अर्ज कोणत्याही कारणास्तव स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.</u> सदरहू वेळापत्रक व कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या सूचना फलकावर लावण्यांत यावा. ह्या कार्यक्रमाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांचे विलंबाने आलेले अर्ज मंडळातर्फे स्विकारण्यात येणार नाहीत. विलंबाने प्राप्त झालेले अर्ज प्राचार्यांनी शिफारस करुन मंडळाकडे पाठवू नयेत. उपरोक्त निर्देशांचे पालन करुन आपण केलेल्या कार्यवाहीचा तपशीलवार अहवाल मंडळाला उलट टपाली सादर करावा.

**उन्हाळी २००९ च्या परीक्षेपासून विद्यार्थ्यांना त्यांच्या विनंतीनुसार प्रति सत्र तथा वर्ष अधिकतम दोन विषयांच्या उत्तरपत्रिकांच्या फोटोकॉपी देण्याबाबत व त्याच विषयांच्याबाबत त्यांनी रिॲसेसमेंटची विनंती केल्यास तशी करण्याबाबत मंडळाने कार्यवाही करण्याचे निश्चित केलेले असून त्याबाबतच्या आवश्यक त्या सर्व सूचना, परिपत्रके मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. त्या सर्व परिपत्रकांचे अत्यंत काळजीपूर्वक परिशीलन संस्थांनी करावयाचे असून त्याप्रमाणे अंमलबजावणी करावयाची आहे. त्यासंदर्भाने कोणतीही शंका/अडचणी असल्यास संस्थाप्रमुखांनी संबंधित विभागीय कार्यालयाच्या उपसचिवांशी संपर्क साधावयाचा आहे.**

<u>**हिवाळी २००९ परीक्षेचे अर्ज -**</u>

**या बाबत ॲकेडमिक कॅलेंडरमध्ये आवश्यक ते निर्देश देण्यात आलेले आहेत याची विशेष नोंद घेण्यात यावी. सदर कालावधीचे तंतोतंत पालन संस्थांनी करावयाचे आहे.**

ज्या विद्यार्थ्यांचे निकाल आर एच आर/प्लाय/डब्ल्यू एफ एल वाय/पी एल एस/डब्ल्यू एफ एल एस अशा प्रकारच्या सदरांत आलेले आहेत अशा विद्यार्थ्यांची पूर्व माहिती (इतिहास) संस्थेतच आहे, ती पडताळून घेऊन विद्यार्थी अनुत्तीर्ण होत असल्यास त्यांचेकडून विहित मुदतीत पुढील परिक्षेकरीता अर्ज भरुन घ्यावेत. उपरोक्त बाबींत विद्यार्थ्यांचा निकाल विलंबाने लागला म्हणून परीक्षा अर्ज स्वीकारण्याची मुदत वाढवून मिळत नाही याची कृपया नोंद घ्यावी व याबाबतची स्पष्ट सूचना विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

मंडळाने घोषित केलेल्या कार्यक्रमानुसार निकाल दुरुस्तीसाठी येणा-या प्रतिनिधीस मंडळातर्फे द्वितीय श्रेणीचे रेल्वे अथवा बसचे भाडे वा सदर प्रतिनिधीस अनुज्ञेय असणारे प्रवास भाडे देण्यात येईल. विहित पध्दतीनुसार विभागीय कार्यालयाकडे देयके सादर करण्यांत यावीत.

आपला,

(प्र. अं. नाईक)
सचिव
म. रा. तं. शि. मं मुंबई– ५१

प्रत

१) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई – ४०० ०५१ यांना सादर.
२) उपसचिव, सी डी सी विभाग, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना माहितीसाठी
२) उपसचिव, म रा तं शि मंडळ, वि का, पुणे / औरंगाबाद / नागपूर व प्रभारी अधिकारी, मुंबई उपविभाग, यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी.
३) कार्यासन अधिकारी, का. क्र. ४५ - आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
४) कार्यासन अधिक्षक, का. क्र. ४३ - आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
५) पोर्टल व्यवस्थापक - संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.
६) स्थळप्रत

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

तक्ता क्रमांक – डी–४०/गुणपडताळणी/२८७

दिनांक – १८.०७.२००९

**उन्हाळी परिक्षा -२००९**

**शीघ्र गुणपडताळणी कार्यक्रम (अंतिम वर्ष-सत्रासाठी )**

---

| अ.क्र. | कार्यक्रम | कालावधी/दिनांक |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांनी थेट विभगीय कार्यालयाकडे अर्ज सादर करण्याचा कालावधी | २४.०७.२००९ ते २७.०७.२००९ |
| २ | विभागीय कार्यालयाने गुणपडताळणी अर्जाच्या करावयाच्या छाननीचा कालावधी | २८.०७.२००९ ते २९.०७.२००९ |
| ३ | गुणपडताळणीच्या याद्या विभागीय कार्यालयाने E-mail द्वारे M.S.B.T.E. कडे पाठविण्याचा दिनांक | ३०.०७.२००९ |
| ४ | M.S.B.T.E. ने सर्व R.A.C. ना E-mail द्वारे गुणपडताळणी यादी पाठविण्याचा दिनांक | ३१.०७.२००९ |
| ५ | R.A.C. नी करावयाची गुणपडताळणीची कार्यवाही | ०१.०८.२००९ ते ०३.०८.२००९ |
| ६ | R.A.C. ने गुणाात बदल असलेल्या उत्तरपत्रिकांसह याद्या विभागीय कार्यालयाकडे पाठविण्याचा दिनांक | ०४.०८.२००९ |
| ७ | अ) विभागीय कार्यालयात त्रिसदस्य समितीने करावयाची कार्यवाही<br><br>ब) विभागीय कार्यालयांनी गुणात बदल झालेल्या विद्यार्थ्यांची यादी विद्यार्थ्यांच्या संबंधित संस्थेला E-mail द्वारे पाठवावी तसेच त्याची एक प्रत संबंधित विभागीय कार्यालयाकडे पाठविण्याचा दिनांक<br><br>क) एक प्रत मंडळाच्या मुंबई कार्यालयात हस्तदेय अथवा E-mail द्वारे पाठवावी.<br><br>ड) गुणांत बदल झाल्याचे तात्पुरते प्रमाणपत्र अंतर्गत संस्थेतील विद्यार्थ्यांना थेट विभागीय कार्यालयाने हस्तदेय पध्दतीने देण्याचा दिनांक | ०५.०८.२००९ ते ०६.०८.२००९<br><br>०७.०८.२००९<br><br>०७.०८.२००९<br><br>०८.०८.२००९ |
| ८ | मंडळाच्या मुंबई कार्यालयात गुणबदलाच्या निकाल दुरुस्तीचे कामाचा कालावधी | १०.०८.२००९ ते ११.०८.२००९ |
| ९ | तंत्र शिक्षण मंडळाच्या विभागीय कार्यालयाकडून गुणपत्रिका विद्यार्थ्यास वितरीत करण्याचा दिनांक | १७.०८.२००९ |

टिप -

१. संस्थांनी या तक्त्यातील अ.क्र. १, ७-ब आणि ड, तसेच ९ मधील तारखा व कार्यक्रमाबद्दल सूचना फलकावर लावून विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे.

२. तृतीय वर्षाची परीक्षा न दिलेल्या प्रथम व व्दितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सर्वसाधारण गुणपडताळणीसाठीच अर्ज करावयाचे असून सर्वसाधारण गुणपडताळणीचा कार्यक्रम मंडळाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येत आहे.

(प्र. अं. नाईक)
सचिव
म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

१. म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, वि.का. पुणे/औरंगाबाद/नागपूर तसेच प्रभारी अधिकारी, मुंबई उपविभाग - यांना कळविण्यात येते उपरोक्त कार्यक्रम सर्व संस्थांना कळवावा तसेच विहित कालावधीत पार पडेल याबाबत दक्षता घ्यावी.

२. पोर्टल मॅनेजर, म.रा.तं.शि.मं. मुंबई - सदर कार्यक्रम पत्र मंडळाच्या संकेतस्थळावर तात्काळ प्रकाशित करावे.

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

तक्ता क्रमांक – डी–४०/गुणपडताळणी/२८७
दिनांक – १८.०७.२००९

**उन्हाळी परिक्षा - २००९**

**सर्वसाधारण गुणपडताळणी कार्यक्रम (वर्ष व सत्र पध्दतीसाठी)**

---

| अ.क्र. | कार्यक्रम | कालावधी/दिनांक |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांनी संस्थेत अर्ज सादर करण्याचा कालावधी | २४.०७.२००९ ते ०१.०८.२००९ |
| २ | संस्थेने विभागीय कार्यालयाकडे अर्ज सादर करण्याचा व विभागीय कार्यालयात संगणकावर करावयाच्या कार्यवाहीचा कालावधी | ०३.०८.२००९ ते ०५.०८.२००९ |
| ३ | गुणपडताळणीच्या याद्या विभागीय कार्यालयाने E-mail द्वारे M.S.B.T.E. कडे पाठविण्याचा दिनांक | ०६.०८.२००९ |
| ४ | M.S.B.T.E. ने सर्व R.A.C. ना E-mail द्वारे गुणपडताळणी यादी पाठविण्याचा दिनांक | ०७.०८.२००९ |
| ५ | R.A.C. नी करावयाची गुणपडताळणीची कार्यवाही | १०.०८.२००९ ते १३.०८.२००९ |
| ६ | बदल झालेली प्रकरणे उत्तरपत्रिकासहीत विभागीय कार्यालयात पाठविण्याचा दिनांक | १४.०८.२००९ |
| ७ | विभागीय कार्यालयात त्रिसदस्य समितीने करावयाची कार्यवाही | १७.०८.२००९ ते १९.०८.२००९ |
| ८ | गुणपडताळणीच्या प्रकरणाचे आदेश (यादी) E-mail द्वारे मुंबई कार्यालयाकडे पाठवावेत | २०.०८.२००९ |
| ९ | निकाल दुरुस्तीच्या प्रक्रियेचा कालावधी | २१.०८.२००९ ते २८.०८.२००९ |
| १० | तंत्र शिक्षण मंडळाच्या विभागीय कार्यालयाकडून गुणपत्रिका संस्थेस वितरीत करण्याचा कालावधी | ०५.०९.२००९ |

टिप -

१. संस्थांनी या तक्त्यातील अ.क्र. १ मधील तारखा व कार्यक्रमाबद्दल सूचना फलकावर लावून विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे.
२. सर्वसाधारण गुणपडताळणी कार्यक्रम वर्ष व सत्र पध्दती या दोन्हींसाठी असून कार्यक्रमाचा कालावधी विहीत पध्दतीने पार पडेल

याबाबत विभागीय कार्यालयानी आणि संस्थांनी दक्षता घ्यावी.

(प्र. अं. नाईक)
सचिव
म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत-

१. म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, वि.का. पुणे/औरंगाबाद/नागपूर तसेच प्रभारी अधिकारी, मुंबई उपविभाग - यांना कळविण्यात येते उपरोक्त कार्यक्रम सर्व संबंधित संस्थांना कळवावा तसेच विहित कालावधीत पार पडेल याबाबत दक्षता घ्यावी.
२. पोर्टल मॅनेजर, म.रा.तं.शि.मं. मुंबई - सदर कार्यक्रम पत्र मंडळाच्या संकेतस्थळावर तात्काळ प्रकाशित करावे.

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

तक्ता क्रमांक - मरातंशिमं/डी-४०/निकालदुरुस्ती/२८७

दिनांक - १८.०७.२००९

## उन्हाळी परीक्षा - २००९

## अंतिम वर्ष - RHR/WFLY

## निकाल दुरुस्तीचा कार्यक्रम

अंतिम वर्ष डब्ल्यू एफ एल वाय प्रकरणे,अंतिम वर्ष आर एच आर प्रकरणे, अंतिम वर्ष डब्ल्यू एफ एल वाय परंतू खालील वर्षाचा निकाल आर एच आर असलेली प्रकरणे तक्त्यात भरून मंडळाच्या मुंबई कार्यालयाकडे माहितीसह खालीलप्रमाणे पाठविण्यात यावीत.

### निकाल दुरुस्तीचा प्रथम टप्पा

| २४.०७.२००९ ते २७.०७.२००९ | |
|---|---|
| **विभाग** | **संस्था क्रमांक** |
| १) मुंबई विभाग | संस्था क्रमांक ००१ ते ०६० मधील संस्था |
| २) पुणे विभाग | संस्था क्रमांक ००६ ते ०७०मधील संस्था |
| ३) नागपूर विभाग | संस्था क्रमांक ०२१ ते १०० मधील संस्था |
| ४) औरंगाबाद विभाग | संस्था क्रमांक ०१६ ते ०८० मधील संस्था |

### निकाल दुरुस्तीचा दुसरा टप्पा

| २८.०७.२००९ ते ३०.०७.२००९ | |
|---|---|
| **विभाग** | **संस्था क्रमांक** |
| १) मुंबई विभाग | संस्था क्रमांक ०६१ ते २०० मधील संस्था |
| २) पुणे विभाग | संस्था क्रमांक ०७१ ते १८० मधील संस्था |
| ३) नागपूर विभाग | संस्था क्रमांक १०२ ते २०५ मधील संस्था |
| ४) औरंगाबाद विभाग | संस्था क्रमांक ०८२ ते २१० मधील संस्था |

## निकाल दुरुस्तीचा तिसरा टप्पा

| ३१.०७.२००९ ते ०३.०८.२००९ | |
|---|---|
| **विभाग** | **संस्था क्रमांक** |
| १) मुंबई विभाग | संस्था क्रमांक २०१ ते ५०० मधील संस्था |
| २) पुणे विभाग | संस्था क्रमांक १८१ ते ४८० मधील संस्था |
| ३) नागपूर विभाग | संस्था क्रमांक २०६ ते ४९९ मधील संस्था |
| ४) औरंगाबाद विभाग | संस्था क्रमांक २११ ते ४८५ मधील संस्था |

## निकाल दुरुस्तीचा चौथा टप्पा

| ०४.०८.२००९ ते ०६.०८.२००९ | |
|---|---|
| **विभाग** | **संस्था क्रमांक** |
| १) मुंबई विभाग | ५०१ च्या पुढील उर्वरीत सर्व संस्था |
| २) पुणे विभाग | ४८१ च्या पुढील उर्वरीत सर्व संस्था |
| ३) नागपूर विभाग | ४९९ च्या पुढील उर्वरीत सर्व संस्था |
| ४) औरंगाबाद विभाग | ४८६ च्या पुढील उर्वरीत सर्व संस्था |



सचिव
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत-

१. म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, वि.का. पुणे/औरंगाबाद/नागपूर तसेच प्रभारी अधिकारी, मुंबई उपविभाग - यांना कळविण्यात येते उपरोक्त कार्यक्रम सर्व संबंधित संस्थांना कळवावा तसेच विहित कालावधीत पार पडेल याबाबत दक्षता घ्यावी.

२. पोर्टल मॅनेजर, म.रा.तं.शि.मं. मुंबई - सदर कार्यक्रम पत्र मंडळाच्या संकेतस्थळावर तात्काळ प्रकाशित करावे.

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

तक्ता क्रमांक - मरातंशिमं/डी-४०/निकालदुरुस्ती/२८७

दिनांक - १८.०७.२००९

## उन्हाळी परीक्षा - २००९

## RHR/WFLY

## निकाल दुरुस्तीचा कार्यक्रम

अंतिम वर्ष वगळता उर्वरित वर्षांचा तसेच सर्व सत्रांचा निकाल RHR असलेली प्रकरणे,वा प्लाय प्रकरणे ही तक्त्यात भरुन मंडळाच्या मुंबई कार्यालयाकडे माहितीसह खालील मुदतीत पाठविण्यात यावीत.

१. संस्थेने तक्त्यात भरुन विभागीय कार्यालयाकडे सादर करण्याचा दिनांक - २८.०७.२००९ ते ०३.०८.२००९

२. विभागीय कार्यालयाने तक्त्यात भरलेली माहिती व संस्थेची निकालपत्रके मुख्य कार्यालयाकडे पाठविण्याचा दिनांक - ०२.०८.२००९ ते ०७.०८.२००९

## निकाल दुरुस्तीचा प्रथम टप्पा

| ०७.०८.२००९ ते १३.०८.२००९ | |
|---|---|
| **विभाग** | **संस्था क्रमांक** |
| १) मुंबई विभाग | संस्था क्रमांक ००१ ते ०५० मधील संस्था |
| २) पुणे विभाग | संस्था क्रमांक ००६ ते ०४९ मधील संस्था |
| ३) नागपूर विभाग | संस्था क्रमांक ०२१ ते १०० मधील संस्था |
| ४) औरंगाबाद विभाग | संस्था क्रमांक ०१६ ते ०६० मधील संस्था |

## निकाल दुरुस्तीचा दुसरा टप्पा

| १७.०८.२००९ ते २४.०८.२००९ | |
|---|---|
| **विभाग** | **संस्था क्रमांक** |
| १) मुंबई विभाग | संस्था क्रमांक ०५५ ते १९३ मधील संस्था |
| २) पुणे विभाग | संस्था क्रमांक ०५१ ते १५१ मधील संस्था |
| ३) नागपूर विभाग | संस्था क्रमांक १०२ ते १५८ मधील संस्था |
| ४) औरंगाबाद विभाग | संस्था क्रमांक ०६१ ते १३६ मधील संस्था |

## निकाल दुरुस्तीचा तिसरा टप्पा

| २६.०८.२००९ ते २९.०८.२००९ | |
|---|---|
| **विभाग** | **संस्था क्रमांक** |
| १) मुंबई विभाग | संस्था क्रमांक २१५ ते ४९५ मधील संस्था |
| २) पुणे विभाग | संस्था क्रमांक २०६ ते ४९१ मधील संस्था |
| ३) नागपूर विभाग | संस्था क्रमांक २५३ ते ४९९ मधील संस्था |
| ४) औरंगाबाद विभाग | संस्था क्रमांक १९४ ते ४८० मधील संस्था |

## निकाल दुरुस्तीचा चौथा टप्पा

| ०२.०९.२००९ ते ०७.०९.२००९ | |
|---|---|
| **विभाग** | **संस्था क्रमांक** |
| १) मुंबई विभाग | उर्वरीत सर्व संस्था |
| २) पुणे विभाग | उर्वरीत सर्व संस्था |
| ३) नागपूर विभाग | उर्वरीत सर्व संस्था |
| ४) औरंगाबाद विभाग | उर्वरीत सर्व संस्था |



(प्र. अं. नाईक)
सचिव
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

तक्ता क्रमांक – डी–४०/फोटोकॉपी-रिॲसेसमेंट/२००९/२८७
दिनांक – १८.०७.२००९

## उन्हाळी परिक्षा - २००९

## फोटोकॉपी तथा रिॲसेसमेंटबाबतचा कार्यक्रम

(वर्ष व सत्र पध्दतीसाठी)

---

| अ.क्र. | कार्यक्रम | कालावधी/दिनांक |
|---|---|---|
| **अ)** | **उत्तरपत्रिकेची फोटोकॉपी मिळण्याबाबतचा कार्यक्रम** | |
| १ | विद्यार्थ्यांनी संस्थेत विहित शुल्कासह अर्ज सादर करण्याचा कालावधी | २४.०७.२००९ ते ०१.०८.२००९ |
| २ | संस्थेने विहित पध्दतीनुसार शुल्कासह यादी (हार्डकॉपी तथा सॉफ्टकॉपीसह) संबंधित विभागीय कार्यालयाकडे सादर करण्याचा कालावधी | ०३.०८.२००९ ते ०५.०८.२००९ |
| ३ | विभागीय कार्यालयाने सी डी च्या फॉर्मेंटमध्ये संकलीत माहिती मुख्य कार्यालयास सादर करण्याचा कालावधी | ०६.०८.२००९ |
| ४ | मुख्य कार्यालयाने सदर माहिती वर्गीकृत करुन संबंधित गुणमुल्यांकन केंद्रांच्या विभागीय कार्यालयांकडे संगणकीकृत प्रणालीव्दारे पाठविण्याचा कालावधी | ०७.०८.२००९ |
| ५ | विभागीय कार्यालयाने सदर माहिती संबंधित गुणमुल्यांकन केंद्राकडे पाठविण्याचा कालावधी | ०८.०८.२००९ |
| ६ | गुणमुल्यांकन केंदाने मंडळाच्या निर्देशांनुसार करावयाच्या कार्यवाहीचा कालावधी | १०.०८.२००९ ते १७.०८.२००९ |
| ७ | गुणमुल्यांकन केंद्रानी कार्यवाही पूर्ण करुन पी सी डी सी कडे सर्व सिलंबद पाकिटे पाठविण्याचा कालावधी | १८.०८.२००९ |
| ८ | पी सी डी सी कडे प्राप्त गुणबदलाच्या प्रकरणांच्या फोटोकॉपी विभागीय कार्यालयाने त्रिसदस्यीय समिती गठीत करुन तपासण्याचा व मंडळाच्या निर्देशांप्रमाणे कार्यवाही करण्याचा कालावधी | २०.०८.२००९ ते २२.०८.२००९ |
| ९ | पी सी डी सी ने प्राप्त फोटोकॉपींची पाकिटे विहित कार्यवाही करुन अन्य पी सी डी सी कडे पाठविण्याचा कालावधी<br>अ) गुणबदल न झालेल्या प्रकरणांसाठी<br>ब) गुणबदल झालेल्या प्रकरणांसाठी | <br><br>१९.०८.२००९ ते २०.०८.२००९<br>२३.०८.२००९ ते २४.०८.२००९ |
| १० | पी सी डी सी ने उत्तरपत्रिकेची फोटोकॉपी संबंधित संस्थेकडे पाठविण्याचा कालावधी<br>अ) गुणबदल न झालेल्या प्रकरणांसाठी<br>ब) गुणबदल झालेल्या प्रकरणांसाठी | <br><br>२१.०८.२००९ ते २४.०८.२००९<br>२५.०८.२००९ ते २७.०८.२००९ |
| ११ | संस्थेने आवश्यक ती नोंद करुन संबंधित विद्यार्थ्यास /अर्जदारास फोटोकॉपी देण्याचा कालावधी<br>अ) गुणबदल न झालेल्या प्रकरणांसाठी<br>ब) गुणबदल झालेल्या प्रकरणांसाठी | <br><br>२५.०८.२००९ ते २६.०८.२००९<br>२८.८.२००८ ते २९.०८.२००९ |

| | | |
|---|---|---|
| १२ | पी सी डी सी ने मुळ उत्तरपत्रिकांची पाकिटे संबंधित गुणमुल्यांकन केंद्राकडे विहित पध्दतीनुसार पाठविण्याचा कालावधी | २४.०८.२००९ ते २७.०८.२००९ |
| **ब)** | **रिॲसेसमेंट (पुनर्गुणमुल्यांकन)करण्याच्या विद्यार्थ्यांच्या विनंतीबाबतचा कार्यक्रम** | कालावधी /दिनांक |
| १ | विद्यार्थ्याने फोटोकॉपीनिहाय विषयांच्या रिॲसेसमेंटसाठी करावयाच्या अर्जाचा कालावधी | २६.०८.२००९ ते ०१.०९.२००९ |
| २ | संस्थास्तरावर रिॲड्रेसल समितीने करावयाच्या कार्यवाहीचा कालावधी | ०२.०९.२००९ ते ०४.०९.२००९ |
| ३ | संस्थेने शिफारस केलेली तथा न केलेली प्रकरणे शुल्कासह सॉफ्टकॉपीव्दारा संबंधित विभागीय कार्यालयाकडे मंडळाने दिलेल्या निर्देशांनुसार सादर करण्याचा कालावधी | ०५.०९.२००९ ते ०७.०९.२००९ |
| ४ | विभागीय कार्यालयांनी सर्व माहिती संकलीत करुन मुख्य कार्यालयाकडे सी डी व्दारे सादर करण्याचा कालावधी | ०८.०९.२००९ |
| ५ | मुख्य कार्यालयाने सदर माहिती वर्गीकृत करुन संबंधित गुणमुल्यांकन केंद्रांच्या विभागीय कार्यालयांकडे संगणकीकृत प्रणालीव्दारे पाठविण्याचा कालावधी | ०९.०९.२००९ |
| ६ | विभागीय कार्यालयांनी संबंधित आर आर अे सी कडे सदर माहिती पाठविण्याचा कालावधी | १०.०९.२००९ |
| ७ | आर आर अे सी ने करावयाच्या पुनर्गुणमुल्यांकनाच्या कार्यवाहीचा कालावधी | ११.०९.२००९ ते १९.०९.२००९ |
| ८ | आर आर अे सी मध्ये केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने त्रिसदस्यीय समितीने करावयाची छाननी व त्या अनुषंगाने निर्गमित करावयाच्या निर्देशांचा कालावधी | २०.०९.२००९ ते २२.०९.२००९ |
| ९ | आर आर ए सी कडून विभागीय कार्यालयांकडे सर्व प्रकरणे मंडळाच्या निर्देशांनुसार सादर करण्याचा कालावधी | २३.०९.२००९ |
| १० | विभागीय कार्यालयांनी मुख्य कार्यालयाकडे पुर्नमुल्यांकनाचा अहवाल सादर करण्याचा कालावधी | २४.०९.२००९ |
| ११ | पुर्नमुल्यांकनामध्ये गुणबदल प्रकरणांनुसार निकाल दुरुस्ती करण्याचा कालावधी | २५.०९.२००९ ते ०३.१०.२००९ |
| १२ | पुर्नमुल्यांकनामध्ये गुणबदल न झालेल्या प्रकरणांचे आदेश निर्गमित करुन विभागीय कार्यालयाकडेपाठविण्याचा कालावधी | २५.०९.२००९ |
| १३ | निकालदुरुस्तीनंतर सुधारित गुणपत्रिका संबंधित विभागीय कार्यालयाकडे पाठविण्याचा कालावधी | ०५.१०.२००९ ते ०७.१०.२००९ |
| १४ | संस्थेने सुधारित गुणपत्रिका विद्यार्थ्यांना देण्याचा कालावधी | ०८.१०.२००९ ते ०९.१०.२००९ |

टिप -

१. संस्थांनी उपरोक्त तक्त्यातील अ आणि ब विभागातील विद्यार्थ्यांशी संबंधित तारखा फक्त सूचना फलकावर लावून विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणाव्यात.
२. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी फोटोकॉपी मिळण्यासाठी अर्ज केलेला असला तरी परीक्षा अर्ज विहित कालावधीतच सादर करणे आवश्यक आहे.

(प्र. अं. नाईक)
सचिव
म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई